सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९

ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिपत्रक :**

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२३/१७९ दिनांक : १२ जुलै, २०२३

**विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील “गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती” या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदत वाढीबाबत...**

**संदर्भ :** १) शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक पशियो-२०२३ /प्र.क्र.५०/तांशि-४, दि. २९ मे, २०२३

२) संचालनालयाचे पत्र क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२३/१५१, १५२ व १५३, दिनांक १२ जून, २०२३

दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली असून, संदर्भाधिन क्र. १ च्या दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये सदरची योजना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिताची जाहिरात दिनांक १२ जून, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याबाबत आपणांस संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक १२ जून, २०२३ च्या पत्रान्वये कळविण्यांत आले आहे की, सदर शिष्यवृत्तीसाठी online पद्धतीने अर्ज करावयाचे असून, उमेदवारांनी अर्ज करण्याची मुदत दिनांक १२ जुलै, २०२३, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दिनांक १३ जुलै, २०२३, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत आहे. तरी, सदरची मुदत वाढवून आता, उमेदवारांनी online पद्धतीने अर्ज करण्याची मुदत **दिनांक १२ जुलै, २०२३ वरुन दिनांक १३ ऑगस्ट, २०२३** अशी करण्यांत येत आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दिनांक **१३ जुलै, २०२३ वरुन दिनांक १४ ऑगस्ट, २०२३** सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत करण्यांत आलेली आहे.

(डॉ. विनोद मोहितकर)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१) संचालक, उच्च शिक्षण पुणे

२) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

३) सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/जळगांव/नांदेड/पनवेल/कोल्हापूर/सोलापूर/नागपूर/औरंगाबाद/अमरावती

# उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीचा सुधारित कार्यक्रम

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | दि. १२ जून, २०२३ ते दि. १३ ऑगस्ट, २०२३ |
| २ | • ज्या उमेदवारांनी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण येथे<br>व<br>• ज्या उमेदवारांनी व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण येथे<br>वर नमूद केल्याप्रमाणे online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सादर करावीत. | दि. १३ जून, २०२३ ते दि. १४ ऑगस्ट, २०२३ (सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत) |